सुधीर मुनगंटीवारांच्या संकल्पनेतून साकारले 'मन की बात गौरव गीत'

°| नाशिकच्या चमूने तयार केले गीत

मुंबई, दि.26 मे 2023:

विश्वगौरव पंतप्रधान मा.श्री नरेंद्र मोदी यांच्या प्रचंड लोकप्रिय झालेल्या 'मन की बात' या कार्यक्रमाचे नुकतेच शंभर भाग पूर्ण झाले. 'मन की बात' च्या या शतक महोत्सवानिमित्ताने नाशिकच्या गायक संगीतकार चमूने 'मन की बात गौरव गीत' साकारले असून नुकतेच सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृहात या गौरव गीताचे प्रकाशन करण्यात आले. विशेष म्हणजे या गीताची संकल्पना सांस्कृतिक कार्यमंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांची आहे. या प्रकाशनाच्या वेळी मुंबई भाजपा अध्यक्ष आ.श्री आशीष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव श्री विकास खारगे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

"मनाचे ठाव घेणारे शब्द व लयबद्ध संगीत आणि मन की बातची वैशिष्ट्ये सांगणारे विविध अंतरे, उत्तम गायन यांनी नटलेले हे गीत लवकरच लोकप्रिय होईल, आणि अधिकाधिक नागरिकांना मन की बात ऐकण्यासाठी प्रवृत्त करेल, असा विश्वास आहे," अशी भावना यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या या 'मन की बात गौरव गीता'चे गीतकार संगीतकार ह् सिनेसृष्ठीतील प्रसिद्ध संगीतकार श्री संजय गीते हे असून सदर गीताचे गायन संजय व श्रावणी गीते यांनी केले आहे. नाशिकच्या सोर्स म्युझिक स्टुडियोने निर्माण केलेल्या या गीताचे व्हिडियो चित्रिकरणही उत्तम झाले असून "मन की बात" चे गौरव करणारे हे देशातील पहिलेच गीत आहे. श्री नितीन वानखेडे हे गीत देशभर पोहोचविण्याकरता समन्वयक म्हणून काम करीत आहेत.